म. ग्रं. सं. ठाणें
काव्य
५६८

॥ ...जानन प्रसन्न ॥

# ...ुलां-मुलींचा




सन १९३८ ] [ वर्ष तिसरें

किंमत १ आणा.

...म विनायक नातू, ६५, बुधवार.

REFBK-0005781
REFBK-0005781

मनपसंत कापड कोठें घ्याल ? दाते, तुळशीबाग गणपतीजवळ, पुणें.

गणेश अमृत देवधर ( गणेशवाडीकर )

रेमार्केट रोड, पुणें.

# लोणी व तुपाचे व्यापारी

आमचेकडे कृष्णा तीरचें ताजें व स्वच्छ खुमासदार लोणी; श्रीखंडाकरितां ताजा, घट्ट व मलईयुक्त चक्का; लोणकढें व खमंग तुपाचीं लहानमोठ्या साइजचीं एक शेरी व अडीच शेरी पावकीं मिळतील.

विशेष सूचना—

लग्नसराईत, मेजवानीच्या प्रसंगीं, गिऱ्हाइकांनीं आमच्या मालाची प्रशंसा केली आहे.

एक वेळ अनुभव घ्या

व

खात्री करा !

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# मुलां-मुलींचा

# मनमोहन मेळा

वर्ष ३ रें, सन १९३८.

५५९

पदें व संवाद लेखक

**स. ना. दातार**

'जागती लक्ष्मी' 'धर्माचा डंका' नाटकांचे कर्ते.

मॅनेजर

**डी. जी. भोळे.**

REFBK-0005781
REFBK-0005781

किंमत एक आणा.

# मनमोहन मेळ्यांतील
## मुलांमुलींचीं नांवें.

| | |
|---|---|
| १ कु. अहिल्या गोखले. | १० कु. कमला काळुसकर. |
| २ ,, मदालसा गोखले. | ११ ,, शांता शुक्ल |
| ३ ,, गोदावरी गोडभोले. | १२ ,, सिंधू अकोलकर. |
| ४ ,, तारा मणेरीकर. | १३ ,, शकुंतला जोशी. |
| ५ ,, लीला मणेरीकर. | १४ ,, मालती साठे. |
| ६ ,, गोदावरी ओक | १५ ,, शांता जोशी. |
| ७ ,, सुमती ओक. | १ दत्तात्रय शुक्ल. |
| ८ ,, सुशिला फडके. | २ गणेश जोशी. |
| ९ ,, इंदुमती टकार. | ३ पांडुरंग साठे. |

## कार्यकारी मंडळ.

१ **अनंत गोविंद देवधर**, संगीत नियोजक.
२ **शंकरराव गोखले**, फिडल वादन.
३ **दत्तात्रय लक्ष्मण जोशी**, तबला वादन.
४ **शिवराम दामोदर करमरकर**, अॅडव्हान्स मॅनेजर.
५ **दत्तात्रय गोविंद भोळे**, मॅनेजर.
६ **सखाराम विनायक नातू**, चालक, मनमोहन मेळा.

स. ना. दातार, यांचें अगामी लिखाण. ‘ माझी सवत ’, ‘ चंद्रवर्मा ’, ‘ घटनाभंग ’. १ शुक्रवार, साठेवाडा, पुणें.

# 'अगोदर'

मनमोहन मेळ्याच्या तिसऱ्या वर्षाच्या, पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची अत्यंत जबाबदारीची कामगिरी, मेळ्याचे मालक श्री. रा. स. वि. नातू यांनीं मला सांगितली. विसावें शतक म्हणजे करमणुकींच्या साधनांचा कळसच होय. मेळ्यावर–त्यांतून मुलामुलींच्या मेळ्यावर–काकदृष्टी ठेवूं पाहाणाऱ्या निंदकांना, श्री गोपालकृष्ण, नटराज, मयुरेश, सरस्वती समाज, आणि स. वि. नातू यांचा मनमोहन इत्यादि मुलामुलींच्या मेळ्यांनीं अलौकिक यश संपादून झणझणित उत्तर दिलें. असो. मनमोहन मेळ्याची प्रथा गेल्या दोन वर्षाप्रमाणें तिसऱ्या वर्षींही दिसून आली. सुबोध पदें, संवाद, रासक्रीडा हें सर्व लिखाण श्री. स. ना. दातार यांनीं लिहून दिलें. संगीतज्ञ श्री. नानासाहेब साठे यांनीं कर्णमधुर चाली दिल्या. 'डेकन स्टार'चे मालक, श्री. शामराव फटाले, मॅनेजर बाबुराव टणक, डायरेक्टर श्री. लेले यांनीं सजावटीच्या कामीं साह्य केलें. श्री. शिवरामपंत जोशी ( माजी हिरो महाराष्ट्र नाटक मंडळी ) यानीं गद्य भाग रंगविला. रा. भोळे, देवधर, जोशी, शिवराम करमरकर, बाबासाहेब करमरकर, नारायणराव दातार, यांनीं श्री. नातू यांना साह्य केलें. याबद्दल मेळ्याचे मालक त्यांचे आभारी आहेत. शेवटीं ज्या गजाननाच्या कृपेनें, मनमोहन मेळा यशस्वी झाला, तसा या वर्षींही लोकप्रिय होवो, अशी सदिच्छा धरून प्रस्तावना संपविते.

मिती भाद्रपद शु॥ ४
शके १८६०

सौ. **प्रमिलाबाई भोळे,** भावे स्कूल, पुणें.

# फीटवेल टेलर

शुक्रवार पेठ, घ. नं. २८, तुळशीबागेसमोर.

वामन लक्ष्मण पोतदार.

---

# चंद्रशेखर भांडार

रे-मार्केटमधील गाळ्यांत चिपळूणकर पुतळ्याशेजारीं.

येथें किराणा, सुकामेवा व मसाल्याचे सर्व सामान मिळेल.

---

# बलवंताश्रम

म्हणजेच उत्तम जेवणाची सोय. एक वेळ ८५ आणे.

प्रो. जी. एस्. कोल्हाटकर, १ शुक्रवार, पुणें, साठेवाडा.

---

कोणत्याही आनंददायक प्रसंगी

## एम्. आर. घोडके यांचे

# सातारी कंदी पेढे वाटा.

लक्ष्मी रोड, गणपती चौक, पुणें.

---

## पी. जी. दाबक अॅन्ड को.

# पेंटर्स अॅंड रबर स्टॅंप मेकर्स

सर्व तऱ्हेचीं पेंटिंगचीं कामें माफक दरांत वेळेवर करून मिळतील. विश्रामबाग वाड्यासमोर, पुणें.

# मनमोहन मेळ्याची

# पद्यावली.



## पद १ लें–नान्दी ( नमन नटवरा )

प्रणति शुभपदा गजाननाला । माय शारदा पद-कमलाला ॥ ध्रु० ॥

सुरम्य सुंदर मूर्तिपूजना । गणेश उत्सवीं वंद्य जनांना ।

मनमोहन मेळा सेवेला ॥ १ ॥

वांछिती कीं सुयशा बाला । मनरंजन ही कविची लीला ।

आशिर्वाद द्या विनति पदाला ॥ २ ॥

---

## पद २ रें ( शिशुपण बरवें )

शिशुगण वंदित गणेश देवा ।

शुभकर, हितकर, मंगल सुखदा प्रभुची सेवा ।

नितांत जिवास अनुपम ठेवा ॥ ध्रु० ॥

गुरुपद आठवा सौख्यविसांवा । लाभ थोर होय जीवा ।

स्वकिय बांधवा प्रार्थना ॥ १ ॥

---

### पद ३ रें ( वंदित राधा )

स्वागत-मेवा सेवा । मान्य करा शिशुलीला ।। ध्रु० ।।
बोल बोबडे सान मुलांचे । सेवे सादरता स्वीकार ।
अर्पित बहुजन-पाया ।
देवकृपा, धर्मसखा, धांव सहाया ।
रक्षण करि जडजीवा ।। १ ।।

---

### पद ४ थें ( अधिर मन बावरें )

देशव्रत पालना । धेनुसंरक्षणा ।
तनुमनें झिजुनिया शिवराज राणा ।। ध्रु० ।।
राज-सिंहासना । देवब्राह्मण-गणां ।
वंद्य जनिं मानिलें ।। १ ।।

---

### पद ५ वें ( प्रभु आसरा )

प्रिय भारता । स्यातंत्र्य द्याया ।
दीनजनांचा आशिर्वाद व्हावा ।। ध्रु० ।।
✓ की मिळवाया संघशक्तिला । लोकजागृति सुमंत्र बरवा ।
तिरंगीं झेंडा घेउनि सहाया ।। १ ।।

---


## एस्. जी. दाबक, टेलर.
### झंपर स्पेशालिस्ट
गाय आळी चौक, पुणें.

### पद ६ वें ( गौळणी गे )

मंत्रिपदा मिळवाया । जन नटलें अति झटले ॥
मान्य जना यश सारे । इतर जना मान उणा ॥
अपयश आलें खरें तया ॥ ध्रु० ॥
हिंद-बांधवा सुखी कराया । निज अधिकारा सिद्ध कराया ।
ती सावधता । मनिं बागविता । भारत-भू दे विजया ॥ १ ॥

---

### पद ७ वें ( फुलल्या कळ्या )

आवडे मना नवकल्पना । नटल्या जना ।
मना वासना । सजविती हिणविती आत्मबला कां वल्गना ॥ ध्रु० ॥
घाताकि अतिशय दरिद्रतेला । बळी पडति नच बालि तयाला ।
जग बावरलें । द्रव्य उधळिलें । मूढ भावना ॥ १ ॥

---

### पद ८ वें ( सत्व पालनाविना )

न्याय राज्या जनिं मान्यता । देती जनां शांत जीविता ।
देति धन्यता ॥ ध्रु० ॥
विकल देश कंठीं पाश वसत ।
हिंद देवी होय दुःखिता ॥ १ ॥

---

ए. वन्. लॉण्ड्री
सफेत कपडा दोन पैसे. रंगीत कपडा तीन पैसे.
प्रो. एस्. बी. सोनसाळे, ८९२ सदाशिव पेठ, पुणें.

## पद ९ वें ( प्रभुवरा )

जननिच्या सुखदा-पदा । आठवा तीं शुभदा ॥ ध्रु० ॥
गोधन तें प्रिय शिवप्रभु जीवा ।
रक्षुनि सुखवी सदा ॥ १ ॥
हिंदु धर्म अति दुर्बळ झाला ।
शांतता कशी ये मना ॥ २ ॥

---

## पद १० वें ( पतितं दीनोद्धरणं )

जनता-रक्षण कामा । बांधुनी करीं रण-कंकणा ॥ ध्रु० ॥
आर्यजन हित पालना । आर्ययुवति शील-रक्षणा ।
होइ सिद्ध तूं या क्षणा ॥ १ ॥

---

## पद ११ वें ( प्रिय जरीं हा )

सुखमय का परदास्यपणा । सावरी जना ।
प्रिय बांधवा । भ्रमकर्म भावना ॥ ध्रु० ॥
गुलामगिरी ती शस्त्राची धार । कापित गर्दन जन बेकार ।
घालिति जगीं धिंगाणा ॥ १ ॥

---

**मा. सो. बेकरी**

**रेमार्केट, पुणें शहर.**

आमचेकडे उत्तम लोणी योग्य भावानें ठोक व किरकोळ मिळेल.

क्र. १९०२
२१/१०

### पद १२ वें ( तुझाच छकुला )

चलांच जमुनि चलाच गं तुम्ही साजणी ॥
जाउनि गाउं गायना । छंद छान या गाना ॥ ध्रु० ॥
सुभाषचंद्रा विजयी वीरा । जनता करिते जयजयकारा ।
छुम् छननन । नादे झणणणण् । नमित जगत गुणवाना ॥ १ ॥

---

### पद १३ वें ( गुणशीला तूं अतुला )

निजदेशा या समया । विसरे कां देशदासा ॥
वैरभाव कां धरिता । होय आज सर्वनाशा ॥ ध्रु० ॥
शिवराया आठवा मनीं । हिंद देश धर्मासी ॥
राखुनिया जरिपटका । अमर कीर्ति जगतावर ॥ १ ॥

---

### पद १४ वें ( किती लाविसी )

८०३८

अजि रुसला चिमणा कां माझा ।
बाळ लाडका गोंडस राजा ॥ ध्रु० ॥
बोल बोलरे मंजुळ बोला । सुखवि माता प्रिय गोपाला ॥ १ ॥

---


## के. बी. आरोळे

**भांग्या मारुतीशेजारीं.**

आमचेकडे उत्तम लोणी, तूप व शुद्ध करडईचें तेल माफक दरांत मिळेल. एक वेळ अनुभव घ्या.

### पद १५ वें ( उघडुनि नयना )

भुलविसी जगता कृष्ण कन्हैय्या ।
खेळत ये अजि धांवत ये । रांगत ये ॥ ध्रु० ॥
वाजवीरे मंजु पावा । दर्शना दे जीवभावा ।
गोपि गाति गोड धांवा । ध्यास लागे रे ॥ १ ॥
दुडदुड धांवे नंद-कुमारा ॥ खेळत ये० ॥
मति होय गुंग प्रभु शामला । नित तव पदीं जिव वाहिला ।
कां त्रास देसी हे माधवा ॥ खेळत ये० ॥ २ ॥

---

### पद १६ वें ( भाग्यवती ही )

आर्यभूमि आर्यांची प्राणदेवता ।
वीर बाजि, श्रीशिवप्रभु भाग्यवान देति मान्यता ॥ ध्रु० ॥
गौरविला स्वकिय देश मिळवुनि जया ।
वैरि स्वमनिं थर थर थर नांव ऐकतां ॥ १ ॥
कीर्तिची फडकविली विजयपताका ।
बैसोनी स्वस्थ कसें मौज पहातां ॥ २ ॥

---


## रेग्युलेशन मोफत

उत्तम रिपेअर्स, सर्व प्रसिद्ध कंपन्यांचीं घड्याळें मुंबई भावानें मिळतील.

**पुणें शहर म्युनिसिपालिटी शेजारीं.**

## पद १७ वें ( भैरवी )

शुभकाल हाच ठरला । कशाचा वैरभाव उरला ॥ ध्रु० ॥
नवभारत हा सुसज्ज झाला । स्मरला खचितचि पुरुषार्थाला ।
जय हा होय स्वराज्याला ॥ १ ॥
अभिमानाला जो बळि पडला । सुख, यश येई कसें अशाला ।
देइ सुबुद्धी श्रीगोपाला ॥ २ ॥

---

## पद १८ वें ( नाचाची भैरवी )

मनमोहन हा मुरलीवाला ॥ कीं हा, मोहि मनाला ॥ ध्रु० ॥
सुमधुर, सुखकर, हितकर लोकीं । बांसरी वाजवी कुंजवना ॥
स्तवुं या, नमुं या, भजुं या, प्रभुला शुभदा ।
निरसोनि अवघी ममता ॥ १ ॥

---


# गोडबोले ब्रदर्स

**फॅन्सी कापडाचे व्यापारी, तुळशीबाग, पुणें.**

सौ. सरस्वतीबाई गोडबोले यांचा शिवण कामाचा व भरत कामाचा क्लास.

**ठिकाणें—(१) तुळशीबाग, (२) डेक्कन जिमखाना, (३) रास्ता पेठ.**

# नाट्यछटा

## १. ' घर-कोंबडा ' ( मुलाकरितां )

लेखिका–सौ. **प्रमिलाबाई भोळे,** भावे स्कूल, पुणें.

अग अग थांब जरा......आत्ताशी कुठे सकाळचे नऊच वाजले आहेत ना ? इतक्या सकाळीं उठून काय करूं मी......काय म्हणालीस ? नोकरीवर जायचं आहे. पक्की विसरभोळी तूं. अग आज रविवार नाहीं का ? कांदेवाडी, आंबेवाडी, नारळवाडी, पोफळवाडी, केळेवाडी, चिखलवाडी, गुलालवाडी, हमालवाडी, कमालवाडी इथूनतिथून सारे नोकरीबहाद्दर ! आढ्याला पाय आणि कुडाभिंतीला डोकं लावून, कुंभकर्णाचे भाऊ झालेले, तुला दिसून येतील. पण तुझी झोंप मात्र झाडावरच्या मारुतीसारखी. जरा खुट्ट झालं कीं, सुट्टदिशी ताडकन् उभी. नाहीं तर बंदुकीचा आवाज, अगर वाघाची डुरकावणी ऐकली, कीं खटपटीशिवाय जमिनीवर...जाऊं दे. मला काय करायचं आहे. तूं माझ्या वाटेला जाऊं नको. मी तुझा रस्ता धरीत नाहीं......आतां आणखी काय पुटपुट चालली आहे तुझी ?... सुटी आहे तर बाजारांत जा. नाहीं जमणार ते......नोकरीच्या दिवशीं सवड नसल्यामुळें, तूंच नाहीं का ' भुलेश्वर ' बघतेस ? रोज ' भुलेश्वर ' बघतेस, आज 'बाबुलनाथ' बघ. आमच्या साडूच्या बायकोचे सासरे, आमच्या लहानपणीं सांगत असत; कै. आगस्त्यांच्या ' स्त्री-साम्राज्य ' नाटकाची गंमत ! वकिलांनीं चहा करायचा तर वकिलीणबाईंनीं गुळाची ढेप खरेदी करायची.........भटणीनं भटाला चटणी वाटायला सांगायची आणि आपण शिधासामुग्री जमवायची. बस ! बस ! ! बस ! ! ! तोच काळ आला

आहे आज......सारे पुरुष ' घरकोंबडे ' झाले आहेत कीं नाहीं ? मग मलाच कां हसतेस ? आँ अंगांत वीज शिरल्यासारखी एकदम थरारलीस... आठवण झाली तुला ? अग कसली ? आज रविवार नाहीं. शेजारचे गुंडोपंत, धोंडोपंत, बंडोपंत, खंडेराव सगळे नोकरीवर गेले ? कुण्णी घरांत नाहीं ? अग अग मंगळागौरी, मला आधीं कां नाहीं सांगितलंस ? अग ' बाजारचा कोंबडा ' होता होता ' आज नोकरी गेली ' तर कायमचा ' घरकोंबडा ' होईन ना आज ! .....मी नोकरीवर गेलों असं समजून चाळींतल्या सगळ्या बायका तुझ्या दिवाणखान्यांत जमतील आणि मला पहातांच म्हणतील ' बायकांत पुरुष लांबोडा ' आणि ' भाजून खातो कोंबडा ! ' तें नाहीं मला पत्करणार. मी पुरुष कोंबडा मुळींच होणार नाहीं. फार तर घरकोंबडा होईन.

---


## दी भगीरथ एजन्सी

**३१ शुक्रवार, आर्यन सिनेमाजवळ.**

मसाला, पापड, मेतकूट, भाजणी, लोणचीं, शिंगाडा पीठ, राजगिरा पीठ, खारीक पीठ, सुका मेवा, शुद्ध करडईचें तेल व सर्व तऱ्हेचा किराणा माल मिळण्याचें प्रमुख ठिकाण.

---

## करपे ब्रदर्स

सर्व प्रकारचे रोल्डगोल्डचे दागिने ( स्त्रियांकरितां ) मिळतील.

**तुळशीबागेजवळ, ५ शुक्रवार.**

# नाट्यछटा

## २. 'सासूबाई' ( मुलीकरितां )

**लेखिका–सौ. प्रमिलाबाई भोळे, भावे स्कूल, पुणें.**

सूनबाई, इकडे ये अगोदर, आलीस कां ? काय करते आहेस तिकडे ! अग बोलत कां नाहींस. कशांत गुंतलं आहे तुझं तोंड ..आवडे, बघ ग तिकडे जाऊन तुझी वहिनी काय करते आहे......काय म्हणालीस, टोपलीखालचा मोदक खाल्लान् चोरून ? ...आवडे तिचा कान धरून आण इकडे......काय बाई चटोर पोरी. आतां विचाराला गेले तर मालकीण-पणाचा टेंभा मिरवील. आमचा कारटाच फाजील. तिला मोटारींत बसवतो, नाटकशिनेमे दाखवतो, हाटेलांत नेतो, त्याचा हा परिणाम. येतेस इकडे कां मी येऊं तिकडे. संपला का तोंडांतला मोदक? आले हो मी तिकडे. हा मेल्यानों, काय ग करतेस ? अग सकाळची वेणीफणी नाहीं कां करायची ? ये इकडे केस विंचरते...हें काय पडलं केसांतून ? काय म्हणालीस काटे आहेत. अग टाक टाक बाहेर. पायांत मोडतील ना ? ...हे डोक्यांतले कांटे बाभळीचे कां बोरीचे ?... आणि हें काय ? वेणीचा आगवळ कुठे आहे? ही चिंधी कसली बांधलीस ?...अग सोंवळं विटाळेल ना ? कठीण ग बाई कठीण. सूनबाई, चांगलं नाहीं हें.... काय तुझ्या नवरोपंतानीं शिकवलन तुला असले थेर थेर करायला. येऊं दे कार्ट्याला...मी त्याला शिव्या दिल्या तर तुझ्या बापाचं...नाहीं नाहीं त्याच्या बापाचं काय खर्च झालं ?...... आलेत कां धारराव ? या. सकाळींच उठून कुठें गेला होतास. नाटकाचीं तिकिटं काढायला ? सकाळचीं नाटकं होतात कां आताशा. धन्य झाली बाई.

येशील केव्हां ! ......आम्ही दोन वाजतां येणार! म्हणजे हिला नेणार आहेस. अरे मेल्या......नाहीं पाठवणार तिला. गोंद्याच्या सोडमुंजीचे पापड घालायचे आहेत. नाटकाला जाणार. तुला पापड लाटतां येत नाहींत ? उलट उत्तर देतेस ! तोंडाला डाग देते तुझ्या.... हं कारट्या, तू मधें तोंड घालूं नकोस. तूच तिला चटोर बनवलीस. कधीं घरकामाकडे लक्ष नाहीं. सदा नट्टापट्टा. एकेक नवीन जिनसा दिसताहेत घरांत. हंसतोस काय हॅः हॅः करून ......अरे मला तुम्ही स्वयंपाकाची बाई का समजलांत ? थांब, आज खोडच मोडते....जेवायचं करीतच नाहीं. नाहीं केलंस तर नाहीं. खाणावळींतला डबा मागवाल ? गोप्या, कांहीं दिवसांनीं किरिस्ताव होशील. मरा मेल्यांनों. मीच चालती होते घरांतून.

---


# पटेल अँड को.

## पैसे वांचविण्याचा उत्तम उपाय !

दुसरा माल खरेदी करण्यापूर्वी पुण्यांत सतत २१ वर्षांपासून प्रसिद्धीस आलेला गुलाब छाप हिंग वापरा.

| पहिला पत्ता— | बदललेला पत्ता— |
| --- | --- |
| शुक्रवार १, साठे वाडा. | ३१ शुक्रवार, आर्यन सिनेमाजवळ. |

गद्य-पद्यात्मक संवाद

# मालक-मजूर.

(लेखक-स. ना. दातार.)

## प्रवेश पहिला

[स्थळ-गिरणीची एक बाजू, पात्रें-मैना, प्रमिला, चिंतामणी, दौलतो, शंतनू.]

मैनाः-(स्वतःशीं) पद-सारंग-त्रिताल.

जयजय शिवराया । बा सदया । विनती करी तव पाया ॥ ध्रु० ॥
दुर्बळ देशाला । समयाला । त्राता कोणी नुरला ।
घे अवताराला । शिवदेवा । हिंदु धर्म राखाया ॥ १ ॥
जगांत बेकारी । महामारी । होते उपासमारी ।
वस्त्र न शरिराला ।—

पद २ रें (ये जगकी)

ही विनंती जगपाला तुजला । येइ रक्षणा प्रभु गोपाला ॥ ध्रु० ॥
दीनानाथा सौख्यसागरा । कोण जगिं र आम्हां थारा ।
जिव हा अन्नाविण तडफडता । नाहीं वस्त्रही अंगाला ॥ १ ॥

(चिंतामणी येतो)

चिंतामणीः-मैना, गाणं बजावणं एकदम बंद! तबला बंद, पेटी बंद! वस्त्र नाहीं, अन्न नाहीं हीं रडगाणीं संगीतांत कशाला सांगतेस? अगोदर शुद्धीवर ये.

मैना:-शुद्धीवर ये! मी बेशुद्ध आहे असं तुम्हाला वाटलं कीं काय?

चिंतामणी:-मग काय शुद्धींत आहेस असं समजतेस? मैना, तुम्हां मजुरांचे ग्रह फिरले आहेत.

मैना:-आम्ही मजूर, आणि चिंतामणी तुम्ही कोण?


माफक दरांत ग्यारंटीनें घड्याळें दुरुस्त करण्याचें

एकच ठिकाण!



म्हणजेच

**डी. जी. भोळे अँड को.**

वॉचमेकर व डीलर्स.

११४६, रविवार पेठ, गोविंद हलवाई चौक, पुणें शहर.


... किती

...पवसानीं इकडे चक्कर फिरली कारकून साहेबांची.

चिंतामणी:-मजुरांचं हजेरीपत्रक दिवसेंदिवस रोडावत चाललं, तेव्हां मला आठवण झाली, म्हटलं स्वत:च पाहून यावं.

मैना:-फार लौकर आठवण झाली. चिंतामणी, आमच्यासारखेच तुम्ही एक मजूर आहांत.

चिंतामणी:-मी मजूर नाहीं, कारकून आहे.

मैना:-म्हणजे मजुरच!

गद्य-पद्यात्मक संवाद

# मालक-मजूर.

पद २ रें ( ये जगकां )

ही विनंती जगपाला तुजला । येइ रक्षणा प्रभु गोपाला ॥ ध्रु० ॥

दीनानाथा सौख्यसागरा । कोण जगिं रे आम्हां थारा ।

जिव हा अन्नाविण तडफडता । नाहीं वस्त्रही अंगाला ॥ १ ॥

( चिंतामणी येतो )

चिंतामणीः–मैना, गाणं बजावणं एकदम बंद! तबला बंद, पेटी बंद! वस्त्र नाहीं, अन्न नाहीं हीं रडगाणीं संगीतांत कशाला सांगतेस? अगोदर शुद्धीवर ये.

मैना:–शुद्धीवर ये ! मी बेशुद्ध आहे असं तुम्हाला वाटलं कीं काय ?

चिंतामणी:–मग काय शुद्धींत आहेस असं समजतेस ? मैना, तुम्हां मजुरांचे ग्रह फिरले आहेत.

मैना:–आम्ही मजूर, आणि चिंतामणी तुम्ही कोण ?

चिंतामणि:–मी चिंतामणी.

मैना:–हें माझ्या प्रश्नाचं उत्तर नाहीं.

चिंतामणी:–तुझ्या प्रश्नांना उत्तरं द्यायला मी इथे आलों नाहीं.

मैना:–मग कशाला आलांत ?

चिंतामणी:–कशाला आलों...थांब आठवण करून सांगतों. कशाला आलों तूंच सांग.

मैना:–आठवणीचं दिवाळं वाजलेलं दिसतंय.

चिंतामणी:–मी विसराळू कसा झालो...आठवलं आठवलं मैना.

मैना:–इतक्या लौकर ? सांगा.

चिंतामणी:–आज रविवार नाहीं, सोमवार आहे. मग गिरणींत सामसूम कां?

मैना:–कां ! आहेत कीं माणसं कामाला.

चिंतामणी:–तरी पण कमीच आहेत.

मैना:–माणसं कमी आहेत, असं आजच तुम्हाला दिसून आलं ? किती दिवसांनीं इकडे चक्कर फिरली कारकून साहेबांची.

चिंतामणी:–मजुरांचं हजेरीपत्रक दिवसेंदिवस रोडावत चाललं, तेंव्हां मला आठवण झाली, म्हटलं स्वत:च पाहून यावं.

मैना:–फार लौकर आठवण झाली. चिंतामणी, आमच्यासारखेच तुम्ही एक मजूर आहांत.

चिंतामणी:–मी मजूर नाहीं, कारकून आहे.

मैना:–म्हणजे मजुरच !

चिंतामणीः—पुन्हां मला मजूर म्हणते. ( प्रमिला येते )

प्रमिलाः—खरं तेंच म्हणते, चिंतामणी.

चिंतामणीः—ही आली दुसरी चिमणी. आतां बोलायलाच नको.

प्रमिलाः—नको कां ? बोला ! तुम्ही बोलल्याशिवाय मजुरांच्या जिवाचा कोंडमारा कसा होईल.

चिंतामणीः—प्रमे, विचार करून बोल. मला कोंडवाडा म्हणतेस. तू मजूर मी कारकून.

मैनाः—कारकून म्हणजे कलमकसाई.

चिंतामणीः—मी कसाई नाहीं, ब्राह्मण आहे.

मैनाः—म्हणूनच वाईट वाटतं.

प्रमिलाः—कसायाचा सुरा पत्करला, पण कारकुनाची लेखणी नको.

मैनाः—सुरा एकदम जीव तरी घेईल. पण कलमकसाई निरपराधी मजुरांना कोंडून मारतील.

चिंतामणीः—मजूर आपला आपण कोंडमारा करून घेतात, त्याला आम्ही काय करावं. ( दौलती येतो )

दौलतीः—गरिबांच्या मागणीकडे लक्ष द्यावं. त्यांची दाद घ्यावी.

चिंतामणीः—हा तिसरा पोपट आला. आतां मी खास जिवंत राहत नाहीं.

दौलतीः—कारकून लोक गरिबांना मारून शेवटीं आपणही मरतात. चिंतामणी, तडजोडीला वेळ लावाल, तर पस्तावाल.

चिंतामणीः—कसली तडजोड ?

प्रमिलाः—मालक-मजुरांच्या झगड्याची.

चिंतामणीः—तडजोड मी कोण करणार ? किशोरबाबू मालक आहेत.

मैनाः—तुम्ही त्यांचे बगलबच्चे आहांत. मालकांच्या प्रत्येक शब्दाला मान डोलवीत असता, खरं असो, खोटं असो.

दौलती:—तुम्ही होयबा मानडोलवे आहांत.

प्रमिला:—तुम्ही गरिबांचे दावेदार आणि मालकांचे तावेदार आहांत.

पद ( पूर्वी—त्रिवट )

न्याय कां तुम्हां नच आवडला ।
म्हणुनि मजुरा उगिच नडला ॥ धृ० ॥
देह कष्टवुनि गुणिजन ठरला ।
तोच मजुर कां तुच्छ वाटला ॥ १ ॥

चिंतामणी:—तुम्ही संपवाल्यांचे भागीदार आहांत. तरी म्हटलं, आज गिरणींत मजूर कां नाहींत, संप केलात होय ?

दौलती:—होय मजुरांनीं संप केला. आतां तुमचे किशोरबाबू आणि तुम्ही हातांत किर्लोस्करी पंप घेऊन, गिरणी धुवायचं काम सुरू करा.

चिंतामणी:—आम्ही गिरण्या धुणार नाहीं. पैशाच्या टंचाईमुळं तुमचीं घरं मात्र साफ धुवून निघालीं.

प्रमिला:—याला कारण तुम्ही. कुऱ्हाडीचे दांडे गोतास काळ.

चिंतामणी:—प्रमे, हा तू माझा पुन्हां अपमान केलास. मघाशी कोंडवाडा म्हणालीस, आतां कुऱ्हाड म्हणालीस, म्हणजे काय हें.

मैना:—कारकूनसाहेब, तुमचे कान येरवड्याला गेले आहेत कां देहू आळंदीला ?

दौलती:—अग कानच काय ? हात, डोळे, नाकासुद्धां. चिंतामणी, गरीब मजुरांच्या पगारांत कपात करून तुमच्या पदरांत काय पडलं ?

चिंतामणी:—अहो, माझ्यावर कां आरोप हा. मी गेल्या गणेश चतुर्थीला चंद्र पाहिल्याचं आठवत नाहीं.

प्रमिला:—आभाळांत नसेल पाहिला. गाईच्या पावलांत.

( शंतनू येतो. )

शंतनूः—प्रमे, तुम्ही इकडं कां ? तिकडे चला. पहा काय गंमत चालली आहे गिरणीवाल्यांची. संप इतका यशस्वी होईल, याची मला कल्पना नव्हती.

दौलतीः—काय आपल्या मागण्या पुऱ्या होताहेत ? वाहवा !

शंतनूः—प्रत्यक्षच पहा चला, आजचा दिवस किती महत्त्वाचा. तुम्ही इकडेच रेंगाळता.

मैनाः—आम्ही तिकडेच येणार होतो. पण वाटेंतच या नंदीनं आम्हाला अडवलं.

प्रमिलाः—हा शिंगशेंपूट विसरून आलेला नंदी...

शंतनूः—कोण हा चिंतामणी ना ? हा आंब्याचा टाहाळा आहे. बारशाला आणि बाराव्याला सारखाच.

चिंतामणीः—छेः आजचा सोमवार म्हणजे माझं गंडांतर. जो येतो तो मलाच शिव्या मोजतो.

दौलतीः—अरे, मोजणारच. पावसाळ्यांत दुतोंडीं असतात ना, तसा तूं.

प्रमिलाः—पावसाळा संपला कीं यांचा अवतार आटोपला. चिंतामणी, संपांत सामील व्हा.

चिंतामणीः—शेजाऱ्याच्या डोक्यांत धोंडा घालायला तुमचं काय जातं. अग मी नोकरी करतो आहे म्हणून दुधभात खाऊन कसे तरी दिवस काढतो आहे.

शंतनूः—त्या दुधांत गरिबांच्या रक्ताचे थेंब पडले आहेत. आयत्या पिठावर रेघा ओढायला तुमचं काय जातं ?

चिंतामणीः—शंतनू, मजूर असून माजोरी झालास. रक्त प्यायला आम्ही काय राक्षस आहोत ? जसं कांहीं अल्ल्ल् डुर्र...

शंतनूः—शंका आहे का ? अरे, आपल्या कारकुनी करामतीची अक्कल, मजुरांच्या कल्याणांत खर्च कर.

दौलती:—अरे, हें काय सांगतोस त्याला. मालकाची मर्जी मिळविल्या-शिवाय, त्याला मलीदा खायला मिळणार नाहीं.

चिंतामणी:—अरे, दौल्या, तू माझ्या गांवचा, माझा लहानपणचा मित्र, आपण एके ठिकाणीं गोट्या खेळलों, रानांत जाऊन जांभळं बोरं खाल्लीं.

शंतनू:—हा वशिला उपयोगी पडणार नाहीं. त्याला सांगतोस, तें स्वतः कां ऐकत नाहींस ?

मैना:—दादा, याच्याशीं बोलून आपल्याला कंटाळा येईल.

प्रमिला:—उपड्या घड्यावर पाणी.

चिंतामणी:—द्या तुम्ही शिव्या. पण तुम्ही मात्र पाठीला तेल लावून ठेवा. किशोरबाबूंना भेटून तुम्हाला चौदावं रत्न दाखवतो. ( जातो. )

दौलती:—शंतनू, आपणही जाऊं. नाहींतर हा चटोर चिंतामणी, कांहीं तरी अक्कल उधळील.

शंतनू:—कोणी कांहीं करीत नाहीं. चला मैना, प्रमिला आज आपल्या श्रमाचं चीज होणार.

पद ( अडाणा—त्रिताल. )

उगवला नभिं भानु हा । विजयी जीवना ।
लाभ झाला । प्राप्त काला । मजुर-जिवाला ॥ ध्रु० ॥
सुदिन दिन हा खास आला । आज हाता ।
ये जयाला । समय सुखद प्रभुलीला ॥ १ ॥

## पहिला प्रवेश समाप्त.

---

## प्रवेश दुसरा

[ स्थळ—गिरणीची कचेरी, पात्रें—किशोर, किशोरी व पहिल्या प्रवेशांतील सर्व पात्रें. ]

किशोरः—ताई, आजचा प्रसंग चमत्कारिक आहे. संपवाले भयंकर चिडले आहेत.

किशोरीः—चिडून काय करणार ? तेरड्याचा रंग तीन दिवस. चार पैशा-वर चार कोस जाणारे मजूर.

किशोरः—ताई, हा तुझा भ्रम आहे. शंतनूनं भलतीच तयारी केली आहे. आणखी चार दिवसांनीं गिरणींत चिडपांखरूं दिसणार नाहीं.

किशोरीः—दादा तू अगदींच हा आहेस. हे मजूर गेले, तर त्यांचे बाप दुसरे. पैसा काय करीत नाहीं.

किशोरः—सगळ्याच गोष्टी पैशानं होत नाहींत. कांहीं ठिकाणीं मनुष्य-बळाची जरूरी असते.

किशोरीः—कसलं आलं आहे मनुष्य बळ, सगळा चोरांचा बाजार आहे.

( चिंतामणी येतो. )

चिंतामणीः—अगदीं खरी गोष्ट. शंकाच नाहीं मुळीं. आज चार पांच दिवस या मजूर चोरट्यांनीं गिरणीची धर्मशाळा केली. पुन्हां चोरांच्या उलट्या...

किशोरः—चिंतामणी प्रसंग बांका आहे.

चिंतामणीः—प्रसंग बांका म्हणूनच गाढवांना म्हणावं लागतं आहे काका.

किशोरीः—आम्ही नाहीं म्हणणार ! त्यांचे लांब झालेले कान, पोटाला एकादशी घडली, म्हणजे आपोआप आंखूड होतील.

चिंतामणीः—कसले आंखूड होताहेत. त्यांच्या संपांत बायकापोरांनीही भाग घेतला.

स्थळ प्रत
सं. ...... नं. ......
ता. ......

किशोरी:—काय म्हणतां बायकाही चळवळ्या झाल्या.

चिंतामणी:—चळवळ्या काय, चळवळीबरोबर खळबळ करूं लागल्या.

किशोर:—अरे बापरे, आतां माझ्या गिरणीचं काय होईल!

चिंतामणी:—ती अहोरात्र चालू राहील. रात्रपाळ्या दिवसपाळ्या सुरूं होतील. पिशवी सैल करा.

किशोरी:—बरोबर बोललात चिंतामणी. दादाला मी हेंच सांगत होते.

किशोर:—तुम्ही सांगता, पण मला पटत नाहीं. चिंतामणी, हे मजूर माझ्या गिरणीला ग्रहण लावणार.

चिंतामणी:—बाबूजी, आपण घाबरतां कशाला? थोड्याच दिवसांत हे मजूर, 'दे दान सुटे गिराण!' करीत दाराशीं येतील. ( शंतनू येतो. )

शंतनू:—दाराशीं यायला, आम्ही संप पुकारला नाहीं. ( दौलती येतो. )

दौलती:—चिंतामणी, मालकांच्या वतीनं तूंच आमच्या चाळीभोंवतीं, कबुतरासारखा 'गटरगुंई' करीत फिरशील.

शंतनू:—बाबूजी, तुमच्या आमच्या झगड्यांत हे अगांतुक कशाला लुडबूड करताहेत?

चिंतामणी:—मी आगंतुक नाहीं आहे.

किशोरी:—आम्हीच त्यांना आमचे अधिकार दिले आहेत. तुम्ही सगळे त्यांच्याशींच बोला.

दौलती:—किशोरीताई, माकडाच्या हातांत कोलीत दिल्यानं घराला आग लागते.

चिंतामणी:—आणि अस्वलाच्या गुदगुल्यांनीं जीव जातो, हें ताईसाहेबांना समजतं आहे.

किशोर:—थांबा, भांडू नका. शंतनू, दौलती, आम्हीं मरावं अशी का तुमची इच्छा आहे.

चिंतामणीः–त्यांची पुष्कळ इच्छा असेल, पण आम्ही इतक्यांत मरणार नाहीं.

शंतनूः–पण आम्हाला मारतां, त्याचा तुम्ही विचार केला आहे कां कधीं?

दौलतीः–कशाला करतील? त्यांचा चरू यथास्थित चालला आहे.

पद ( अति आपदा )

नच भावना । कटु कल्पना । चैनी जनां । हृदयीं दया ना ॥ ध्रु० ॥
हे अंध धुंद सदा गरिबा । छळिती मनाला मुळिं लाज ना ॥ १ ॥

किशोरः–मुळींच नाहीं. या संपामुळें आमची पांचावर धारण—

चिंतामणीः–अहो, अहो, काय करता हे. यामुळें त्यांना फूस देत आहांत.

किशोरीः–दादा, तूं चुकून नाहीं ना गिरणीचा मालक झालास.

चिंतामणीः–बाबूजींचं अंतःकरण म्हणजे लोण्याचा गोळा.

( मैना व प्रमिला येतात. )

प्रमिलाः–आणि तुम्ही मूर्तिमंत दगड !

मैनाः–नुसता दगड नाहीं, काळा फत्तर !

दौलतीः–त्याला सुद्धां एखादे वेळीं पाझर फुटेल.

शंतनूः–पण हा अगदींच कोरडा ठणठणीत.

चिंतामणीः–ही चांडाळ चौकडी जमली. आतां काय ?

दौलतीः–आम्ही चांडाळ चौकडी, तर तुम्ही दोषांचं त्रिकूट. हिरडा, बेहडा, आवळकटी.

शंतनूः–अगदीं त्रिफळा चूर्ण.

किशोरः–अरे कां उगीच भांडत बसलात तुम्ही. तुम्ही असे भांडलात, तर माझ्या गिरणीचं काय होईल?

दौलतीः–तडजोड केलीत तर गिरणी, नाहीं तर गुलकंदाची रिकामी बरणी.

[stamp]

किशोरीः--अशी कोल्हेकुई माजवूं नका. नेहमींप्रमाणें कामावर येणार कीं नाहीं. विचार करून उत्तर द्या.

मैनाः--विचार अगोदरच केला आहे.

प्रमिलाः--त्याशिवाय संपाचा झेंडा उभारलाच नाहीं.

दौलतीः--झेंडा उंचा रहे हमारा !

चिंतामणीः--जेवायला आहे कां घरीं पोटभर ? झेंडा नाचवताहेत लेकाचे.

शंतनूः--ए चिंतामणी.

प्रमिलाः--हा नुसता चिंतामणी नाहीं. मूर्ख चिंतामणी.

किशोरः--जय भवानी. माझ्या गिरणीला शाप देऊं नको.

किशोरीः--वाहवारे माझा दादा ! बांगड्या भर हातांत. आणि म्हण दुर्गे दुर्घट भारी.

चिंतामणीः--असं म्हटलंत तरी ती करुणा विस्तारणार नाहीं.

दौलतीः--ही चिंतामणीची पिपाणी वाजते आहे, तोपर्यंत कांहीं होणार नाहीं.

किशोरः--चिंतामणी, तुम्ही म्हणजे एक वर्तमानपत्र आहांत. वाऱ्याच्या झोताबरोबर कोणत्या मुलखांत उडून जाल, त्याचा नेम नाहीं.

चिंतामणीः--तुम्हीही उलटलांत कां ? बाबूजी, तुमच्या हिताकरितां मी मेणबत्तीसारखा उभा असतांना—

किशोरीः--चिंतुअण्णा भिऊं नकोस. दादाच्या मदतीशिवाय, आपण या लोकांची खोड मोडूं.

चिंतामणीः--म्हणजे आतां गिरणी बंद ठेवून, खोड मोडायचा कारखाना सुरू करणार कीं काय ?

किशोरः--अरे, तुम्ही सगळे माझ्या गिरणीच्या जिवावर कां उठलात ?

शंतनूः--बाबूजी, या ताज्या घोड्यावरच्या गोमाशा आहेत.

दौलती:—आमच्याशिवाय तुमचा निभाव लागायचा नाहीं.

किशोरी:—दौलती, बेडूक फुगला तरी बैलाची बरोबरी करणार नाहीं.

चिंतामणी:—कावळ्यांनीं आंगाला चुना फासला, तरी तो बगळा होणार नाहीं.

शंतनू:—अरे बगळा तो बगळाच. पाहिलेस दौलती, हे किशोरबाबूंचे हितकर्ते—

पद ( जगतीं पुरुष )

किती हे कुटिल अजाण । अधम कपटि सारे,
वारे पठ-मति जगभर सजुनि नटुनि अविरत छळिती
गुणिजन हे फसविती ॥ ध्रु० ॥
दुराग्रही गर्वांध अखिल खल । ग्रासी स्वक्रिया परि अति विकल
करिती, मुळिं न गणिती दुर्बुद्धी कां धरिती ॥ १ ॥

किशोरी:—शंतनू! मर्यादा सुटली, तोल गेला, पायरी विसरलास. खाल्लया घरचे वासे मोजण्याची बुद्धी चांगली नाहीं.

प्रमिला:—आणि दुसऱ्याच्या घराला आग लावून त्या आगीवर आपल्या भाकरी भाजण्याची बुद्धी चांगली कां?

चिंतामणी—:प्रमे, मला शिव्या दिल्यास त्या मी मुकाट्यानी खाल्लया.

मैना:—शिव्या खाऊन जगायची वेळ आली कां तुमच्यावर.

किशोरी:—मैना, चिचुंद्रीसारखी तूं कशाला चुक्चुक् करतेस.

चिंतामणी:—त्याशिवाय तिचं पोट भरायचं नाहीं. प्रमे, ताईसाहेबांच्या तोंडाला तोंड देण्यापर्यंत तुझी मजल आली?

शंतनू:—आणि तुझी मजल गरिबांच्या पोटावर पाय देण्यापर्यंत आली.

दौलती:—अरे याला श्रीमंत होण्याची लहर आली असेल.

प्रमिला:—हो हजारों गरीब मेल्याशिवाय एक श्रीमंत होत नाहीं.

मैना:—बाबूजी, आम्ही इथें शब्दांचा बाजार मांडायला आलों नाहीं.

चिंतामणी:—शब्दांचा नाहीं. पण शिव्यांचा बाजार मात्र मांडला आहांत. 'बाल-दिन' असतो तसा आज तुमचा 'शिव्या-दिन' आहे.

किशोरी:—दादा, उद्यांच्या उद्या 'टोळधाड' वर्तमानपत्रांत जाहिरात देऊन, सातासमुद्रापलीकडचे मजूर बोलाव. यांची मिजास नको.

शंतनू:—मिजास तुम्हाला चढली आहे. मजुरांच्या मेहनतीवर तिजोऱ्या भरून, आतां तो पैसा परदेशी मजूर बोलावण्यांत खर्च करणार.

दौलती:—एकाची पोळी खाऊन दुसऱ्याची टाळी वाजविणार?

चिंतामणी:—टाळी वाजवायला इथे हरदासाची कथा नाहीं किंवा नाटकाचं थिएटर नाहीं. वन्समोर, नो मोर, फुर्रर्र वगैरे वगैरे—

किशोरी:—तुमची कटकट ऐकून आमचे कान किटले.

प्रमिला:—आमचा कुठे आग्रह आहे. चलारे सारे.

किशोर:—थोडे थांबा, मी सांगितल्याशिवाय, माझ्या गिरणीजवळ काडी-मोड करूं नका.

चिंतामणी:—बाबूजी, तुम्हाला 'अत्रेकृत' साष्टांग नमस्कार असो.

मैना:—कां तुमचा 'भ्रमाचा भोपळा' फुटायच्या बेतांत आला?

किशोर:—अरे पण माझ्या गिरणीचा 'राजसंन्यास' होईल.

दौलती:—प्रत्येक बाबतींत तुम्हीच 'पराचा कावळा' केलात.

किशोरी:—म्हणून तुम्ही आमच्याशीं बरोबरी करून 'मोरांचा नाच' सुरूं केलात?

शंतनू:—अलबत! 'ठोशास ठोसा' ही लोकमान्यांची शिकवण आहे.

चिंतामणी:—लोकमान्यांचा फोटो तरी पाहिला आहेस कां?

किशोर:—पुरे करा ही बटबट! शंतनू बोल. तडजोड करतां कीं विलायती मजूर मागवूं?

दौलतीः—बोलवा, त्याशिवाय त्यांचे बूट, तुमच्या देवांच्या डोक्यावर बसणार नाहींत.

चिंतामणीः—ते पत्करले. दौलती, यथा राजा तथा प्रजा झालीच पाहिजे.

शंतनूः—चिंतामणी, देशद्रोह करण्यापेक्षां टिळक तलावांत जीव कां देत नाहींस ?

किशोरीः—शंतनू, लोकांच्या जिवाला किंमत आहे.

प्रमिलाः—आणि आमचे जीव वाटेवर पडले आहेत ?

मैनाः—कीं वाटेल त्यांनीं पायाखालीं तुडवावेत.

चिंतामणीः—पायाखालीं तुडवायला तुम्ही काय खजूर आहांत.

किशोरः—चिंतामणी, थट्टेची मस्करी नको. मला त्यांचं म्हणणं ऐकूं दे.

किशोरीः—पाया पड त्यांच्या. तुला बाणेदारपणा नाहींच.

चिंतामणीः—ताईसाहेब, बाबूजी बाणेदार नसले, तरी मी त्यांचा ठाणेदार आहे. बोला रे, आणि बोला ग तुमचं काय म्हणणं आहे.

दौलतीः—ए मोत्या, गप्प बैस. भों भों करशील तर गळ्यांत साखळी घालीन.

चिंतामणीः—तुझ्या गळ्यांतला पट्टा संभाळ अगोदर.

शंतनूः—बाबूजी, इथें सगळा पोरखेळ सुरूं झाला. जातो मी.

किशोरीः—जा, जा.

किशोरः—नाहीं. या, या, मी तडजोड करतो.

दौलतीः—कशा रीतीनं ?

चिंतामणीः—तुमचे कान धरून तुम्हाला बाहेर काढतो.

किशोरः—चिंतामणी, पाया पडूं कां तुझ्या.

किशोरीः—चिंतुअण्णा, आपणच इथून जाऊं. दादा, पाया पड नाहींतर धडपड. ( किशोरी व चिंतामणी जातात. )

शंतनूः—पाहिलंत बाबूजी, सुखाची पाखर निघून गेली.

किशोरः—शंतनू, मजुरांच्या कल्याणांतच देशाचा उद्धार आहे, हें मला आज समजलं.

शंतनू:—श्रीगजानन, तुमचें मंगल करील.

दौलती:—तुमची कीर्ति भरतखंडांत होईल.

किशोः—रचला आतां गिरणींत—

प्रमिला:—थांबा, त्याच्या अगोदर—

सर्वः— कोरस ( बोला मधु )

लाभे यश हें अमोल। कीर्ति होय कीं विशाल।
खचित येइ भाग्य-काल ॥ ध्रु० ॥
अज्ञ अशा शिशुप्रेमा। आशिर्वच सुखधामा।
देई प्रभो, जय कृपाल ॥ १ ॥

**समाप्त**

॥ ॐ तत्सत् ॥

---

**मनमोहन मेळ्यांत श्री. शंकर गणेश म्हसकर यांचें फिडल वादन ऐका !**

---

# एस्. व्ही. इनामदार यांचे

## ब्राम्हणाचें फुलांचें प्रसिद्ध दुकान

आमचेकडे शुभ प्रसंगीं ऑर्डरप्रमाणें हार, गोटे, गुच्छ, वेण्या व निरनिराळ्या डिझाईनच्या मोटारी शृंगारून मिळतील. तसेंच केळीचे खुंट व पानें ऑर्डरप्रमाणें मिळतील.

८६८, सदाशिव पेठ, पुणें.

१६ वर्षें नांवाजलेला

## गोटाकंबे, निलगिरी चहा,

## व म्हैसूर सुगंधी उदबत्ती

८६७, सदाशिव पेठ, पुणें.

---

## खंडेराव बळवंत वर्णीकर, यांचे

## सराफी दुकान, तुळशीबाग, पुणें.

खरे व कल्चर्ड मोत्याचीं कुडीं, बांगड्या, पेंदी वगैरे माल ग्यारंटीचा मिळेल. तसेंच सोन्याचा व चांदीचा सर्व तऱ्हेचा माल तयार व ऑर्डरप्रमाणें करून मिळेल. खरेपणाबद्दल ग्यारंटी दिली जाते.

---

## बाबुराव रामशेट वाईकर, सराफ

आमचे दुकानीं सर्व तऱ्हेचे सोने, चांदीचे, कल्चर्ड मोत्याचे डिझायनेबल दागिने तयार व ऑर्डरप्रमाणें वक्तशीर तयार करून मिळतील. सोने, चांदीची जुनी मोड योग्य भावानें खरेदी केली जाईल.

य दुकानः—कसबा, गणपती समोर.

—तुळशीबाग, पश्चिम दरवाजा, पुणें.

REFBK-0005781

REFBK-0005781

---

## R. D. PUROHIT.

Brass & Copper Merchant,

145, Raviwar Peth, POONA 2.

## आर. डी. पुरोहित

तांबा, पितळेचे भांड्यांचे व्यापारी, १४५, रविवार पेठ, पुणें.

॥ श्री ॥

# रामकृष्ण स्वदेशी स्टोअर्स

कापडाचे व्यापारी

तुळशीबाग पश्चिम दरवाजा.

---

## तयार मच्छरदाण्या

स्वस्त मिळण्याचें एकच ठिकाण !

शिवाय

कोणत्याही साईजच्या मच्छरदाण्या

ऑर्डरप्रमाणें तयार करून देऊं

---

एक वेळ येऊन


अनुभव घ्या !



पाप्यूलर वॉच कंपनी, लि०.

बुधवार पेठ, बाहुलीचे
हौदाशेजारीं.

# जगप्रसिद्ध घड्याळांचे
व
# चष्म्यांचे व्यापारी.



रजिस्टर्ड डीलर्स, इन् फावर लुबा
वॉच कंपनी, लिमिटेड.

क्रूक लेन्स जोडी २ रुपये.

---

प्रकाशक-सखाराम विनायक नातू, ६५ बुधवार, पुणें.
मुद्रक-शं. का. निगडे, 'व्यापारी छापखाना' २८ शुक्रवार, पुणें.